# अहवाल

# हिरापूर / हमेशा येथे बहिस्थ कार्यक्रमाचे आयोजन

## दि. १६/१०/२०२५

गोंदिया शिक्षण संस्थेद्वारा संचलित सेठ नरसिंगदास मोर महाविद्यालयाच्या कला शाखेच्या वतीने तुमसर तालुक्यातील हिरापूर (हमेशा) या गावात 'ग्रामीण विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्या व उपायोजना' यावर एका परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी कला शाखेचे प्रभारी डॉ. जयंतकुमार मस्के म्हणाले की, 'ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा न डगमगता विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करावे, स्वतःचे ध्येय हे स्वतःचे जीवन कार्य समजून त्या दिशेने प्रयत्न करावेत. कितीही समस्या आल्या तरी ध्येयापासून भरकटून जाऊ नये.' समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ राहुल भगत म्हणाले की, 'उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांना सरकारची स्कॉलरशिप मिळत असते. तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. याचा लाभ ग्रामीण विद्यार्थ्यांनी घेऊन आपले शिक्षण अर्धवट सोडून देऊ नये.'

या कार्यक्रमात हिरापूर गावातील विद्यार्थी आणि महाविद्यालयातील कला शाखेचे प्राध्यापक यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यात आली. याप्रसंगी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीवजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने 'पोस्टर प्रेसेंटेशन' करण्यात आले. तसेच हिरापूर गावातील विद्यार्थ्यांना येणाऱ्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक समस्या जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीद्वारे सर्वेक्षण करण्यात आले. यात प्राथमिक ते पदवी शिक्षण घेणाऱ्या एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी डॉ. रेणुकादास उबाळे यांचेही मार्गदर्शन लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी एकाग्रतेवर आधारित खेळाचे आयोजन केले.

ह्या बहिस्थ कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राधेशाम दिपटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयातील डॉ. राजेंद्र बेलोकार प्रा. अमोल

खांदवे, डॉ. राजेश दिपटे, प्रा. जनार्दन मेश्राम  सहभागी झाले होते. तसेच हिरापूर गावाचे रहिवासी असलेले महाविद्यालयातील विद्यार्थी गुलशन गौपाले, हुसेन गौपाले, रोहन गौपाले, कु. नेहा मुंगूसमारे, कु. हंसू कुपाले व कु मुस्कान शेंदरे यांचे सहकार्य लाभले.



## विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करावे- डॉ. जयंत मस्के

तुमसर । 'ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा न डगमगता विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करावे' असे प्रतिपादन कला शाखेचे प्रभारी डॉ. जयंत मस्के यांनी व्यक्त केले. डॉ. जयंत मस्के म्हणाले की, 'ग्रामीण विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करावे. स्वतःचे ध्येय हे स्वतःचे जीवन कार्य समजून त्या दिशेने प्रयत्न करावेत. कितीही समस्या आल्या तरी ध्येयापासून भरकटून जाऊ नये.'

सेठ नरसिंगदास मोर महाविद्यालयाच्या कला शाखेच्या वतीने तुमसर तालुक्यातील हिरापूर (हमेशा) या गावात 'ग्रामीण विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्या व उपायोजना' यावर एका परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ राहुल भगत, डॉ. रेणुकादास उबाळे यांचेही मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमात हिरापूर गावातील विद्यार्थी आणि महाविद्यालयातील कला शाखेचे प्राध्यापक यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे ही देण्यात आली.













